# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

### माहिती कक्ष, दि. ०५ एप्रिल २०२३

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १८२/२०२३ भादंविसक ३८०,४५४,४५७,५११ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १२/१२/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा ते दि. ०३/०४/२०२३ रोजी पहाटे ०५.०० वा चे दरम्यान, ए- ३३० सिंधु विहार, हिंदु कॉलनी, विजापूर रोड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०५/०४/२०२३ रोजी ११.१५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विकास पांडुरंग बेलवळेकर, वय- ३९ वर्षे, रा. मु.पो. सोंनगे, ता. कागल कुरुकली गाव, जि. कोल्हापुर, सध्या- मु.पो. वरसगाव, ता. वेल्हा, जि. पुणे |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | निरंक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील ए- ३३० सिंधु विहार, हिंदु कॉलनी, विजापूर रोड, सोलापूर, येथील फिर्यादीच्या भावाचे सासु मनोरमा अशोक पाटील या त्यांच्या राहत्या घरास कुलुप लावून फिर्यादीच्या भावाकडे मेघालय, तुरा, येथे राहण्यास गेल्या असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे घराचे मुख्य दरवाजाचे कडी कोयंडा तोडुन प्रवेश करुन व घरातील इतर दरवाजाचे कडीकोयंडा तोडुन व बेडरुम मधील लोखंडी कपाटाचे लॉक तोडुन चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे म्हणून. तपास:- पोना/ १४०४ शिर्के |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १८३/२०२३ भादंविसक ४२० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २५/०२/२०२३ रोजी १७.०० वा ते दि. २६/०२/२०२३ ररोजी ११.०० वा चे दरम्यान, १७४, लक्ष्मी नगर, हत्तुरे वस्ती, विमानतळ जवळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०५/०४/२०२३ रोजी ११.४९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | शुभांगी शांतकुमार लच्याणे, वय- २९ वर्षे, रा. १७४, लक्ष्मी नगर, हत्तुरे वस्ती, विमानतळ जवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अनोळखी इसम मोबाईल क्रं. +८५२६२१७७५३२ |
| **फसवणुक र** | : | ८३,३१३/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि. २६/०२/२०२३ रोजी फिर्यादीस २nd task असल्याने फिर्यादी यांनी ३,०००/- रु गुंतवणुक केले होते. परंतु काही वेळाने फिर्यादीच्या रजिस्टर वेबसाईटवर पैसे जमा न झाल्याने फिर्यादीने अनोळखी व्यक्ती वरील मोबाईल क्रमांकावर फिर्यादीने मेसेज करुन विचारले असता, त्यांनी सांगितले की आपण २nd task करीता खुप कमी रक्कम भरली आहे. तरी आपणास अजुन रक्कम हि गुंतवणुक करावी लागेल. त्यामुळे आपणास दिलेल्या Task प्रमाणे आपण ती ऑर्डर GRAB करा असे सांगितले. पुर्ण TASK झाल्यास आपणास जास्त पैसे रिफंड होतील त्यामुळे फिर्यादीने वरील आरोपीत मोबाईल धारकावर विश्वास ठेवून, एकुण- ८६,३१३/- रु GRAB वर पाठविले त्यांनी सांगितल्या प्रमाणे टास्क पुर्ण केला. त्यानंतर फिर्यादीने खुप वेळ वाट बघुन खात्यावर पैसे जमा झाले नाहीत. सदर पैसे हे फिर्यादीने GRAB करुन त्या वस्तुवर ऑर्डर केले होते. परंतु त्यामधुन रक्कम ही रिफंड झालेली नाही ती रक्कम हि परत न आल्याने सदर अनोळखी इसमाने फिर्यादीची आर्थिक फसवणुक करत असल्याची खात्री झाली. सदर अनोळखी इसमाने फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणून. तपास:- पोसई/ शेख - ९९२३७०१९६६ |